**प्रेस टीप: अमरावतीमध्ये हवेची गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली चांगली आहे, तरीही प्रदूषण प्रमाण जास्त आहे, iFOREST च्या स्मॉग टेल्स कॅम्पेन मध्ये या स्थितीचा खुलासा**

**'स्मॉग टेल्स: जाणून घ्या 'तुमचे शहर आणि तुमचा श्वास ' ही पर्यावरण-संशोधन संस्था iFOREST यांची वायू प्रदूषणावरील मोहीम आहे. सध्या सुरू असलेली ही माहिती मोहिम भारतातील लहान शहरांना त्रस्त करणाऱ्या वायू प्रदूषणाकडे लक्ष वेधते आणि सामूहिक कृतीचे आवाहन करते.**

**मोहिमेचा पर्व १ वर्ष २०२४ मध्ये सुरू झाले आणि त्यामध्ये उत्तर भारतातील पाटणा, गुवाहाटी, मेरठ, बद्दी आणि चंदीगड यांसारख्या वेगाने विकसित होणाऱ्या शहरांचा समावेश केला गेला . यावर्षीच्या पर्व २ मध्ये आम्ही महाराष्ट्रातील वेगाने वाढणाऱ्या शहरांवर, म्हणजे ठाणे, अमरावती, नागपूर, औरंगाबाद आणि भिवंडी या शहरांवर लक्ष केंद्रित केले आहे .**

हे विश्लेषण हिवाळ्याच्या आगमनामुळे आणि बांधकाम आणि शहरी विस्तारामुळे अमरावती शहरामधील प्रदूषणाच्या गंभीर स्तरावर प्रकाश टाकते

**मुख्य निष्कर्ष:**

**१) पार्टिक्युलेट मॅटरची उच्च पातळी:**

- शिवनेरी कॉलनी CAAQMS येथे $PM_{2.5}$ ची २०२४ वार्षिक सरासरी एकाग्रता, 35.25 μg/$m^3$ इतकी आढळली जी CPCB च्या 40 μg/$m^3$ मानकाच्या आत आढळली तथापि, $PM_{10}$ ची एकाग्रता 82.07 μg/$m^3$ पर्यंत पोहोचली, जी 60 μg/$m^3$ या CPCB मानकापेक्षा १.३७ पट जास्त आहे.
- श्री शिवाजी सायन्स कॉलेज CAAQMS मधील $PM_{2.5}$ ची २०२४ वार्षिक सरासरी एकाग्रता 38.5 μg/$m^3$ इतकी आढळली जी CPCB च्या, 40 μg/$m^3$ मानकाच्या आत आढळली तथापि , तर $PM_{10}$ ची एकाग्रता 90.63 μg/$m^3$ पर्यंत पोहोचली, जी 60 μg/$m^3$ या CPCB मानकापेक्षा १.५१ पट जास्त आहे.

**२) उच्च प्रदूषण तास:**

- $PM_{2.5}$ आणि $PM_{10}$: हिवाळ्यामध्ये प्रदूषण एकाग्रता सकाळी ९ ते ११ आणि रात्री ८ ते ११ या दरम्यान आढळून आली.
- ओझोन: पातळी संध्याकाळी १ ते ४ दरम्यान सर्वाधिक आढळून आली.
- $NO_2$: रात्री ८ ते ११ दरम्यान उच्च एकाग्रता दिसून आली.
- हिवाळ्याच्या महिन्यामध्ये, $PM_{2.5}$ ची सरासरी एकाग्रता ५४.०३ μg/$m^3$ तर $PM_{10}$ ची सरासरी एकाग्रता १२२.४९ μg/$m^3$ इतकी आढळून आली जी CPCB वार्षिक मानकांपेक्षा अनुक्रमे १.३५ आणि २.०४ पट आढळून येते.
- $PM_{2.5}/PM_{10}$ याचे ०.४६ प्रमाण हे वाहतूक, धूळ आणि इतर उत्सर्जनांसह मिश्रित प्रदूषणाचा स्रोत दर्शविते.
- पावसाळ्याच्या महिन्यांमध्ये प्रदूषक पातळीत लक्षणीय घट दिसून आली, जी जोरदार हंगामी भिन्नता दर्शवते (वार्षिक सरासरी PM पातळीच्या तुलनेत ६९% घट).

**3) गुणवत्ता आणि माहीतच कल**

- सध्या, अमरावतीमध्ये तीन मॅन्युअल (मानवी) आणि दोन CAAQMS मॉनिटरिंग स्टेशन आहेत. तथापि, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ च्या नियमांनुसार, शहराला सहा स्थानके आवश्यक आहेत - तीन CAAQMS आणि तीन मॅन्युअल ( मानवी).
- २०१९ मध्ये, अमरावती शहराला 'नॅशनल क्लीन एअर प्रोग्राम' अंतर्गत नॉन-एटेन्मेंट सिटी म्हणून नियुक्त केले गेले होते तरीही २०१८ पासून ते २०२३ पर्यंत शहरामधील हवेच्या गुणवत्तेचे निरीक्षण केले गेले नाह। २०२४ नंतर ची माहिती उप्लब्ध असल्यामुळे दूरगामी विश्लेषणाचा अभाव जाणवून येतो

**पटलावरील तज्ज्ञांची मते**



**डॉ हरीश फुलेरिया, सहयोगी प्राध्यापक , पर्यावरण विज्ञान, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मुंबई**

- **विश्वासार्ह्य माहिती हा प्रभूषण नियंत्रणाचा मूलभूत पाया आहे:** अमरावती मध्ये २०२३ पूर्वीच्या विशेषतः अनौपचारिक उद्योगांमधून उत्सर्जन माहितीचा अभाव आहे. विश्वासार्ह निदान आणि धोरणनिर्मितीसाठी कमी किमतीचे, नियमितपणे कॅलिब्रेटेड मॉनिटरिंग व्यवस्था बळकट करणे आवश्यक आहे.
- **अनौपचारिक आणि विसर्जित कचरा जाळणे हा एक दुर्लक्षित स्त्रोत आहे:** सुरक्षा रक्षक आणि काळजीवाहक सहजपणे उपलब्ध कचरा जाळतात, ज्यामुळे संपूर्ण भारत-गंगेच्या पठारावरील हिवाळ्यातील प्रदूषणात लक्षणीय योगदान होते. घनकचरा संकलन सुधारणे आणि जाळण्याविरोधी नियमांची अंमलबजावणी करणे हे अल्पकालीन महत्त्वाचे उपाय आहेत.
- **इंधन भेसळीमुळे असमान उत्सर्जनात वाढ आहे:** प्रमाणापेक्षा जास्त इंधन घनता हि इंधन भेसळ दर्शविते ज्यामुळे वाहनांच्या धुरात आणि उत्सर्जनात मोठ्या प्रमाणात वाढ होते आणि वाहनांचे मानक कमी होते.
- **बांधकाम धूळ आणि कमकुवत स्थानिक व्यवस्थापनामुळे हवेतील कणांच्या प्रदूषणात वाढ**: वाढत्या बांधकामामुळे आणि कणांच्या पुनः प्रस्थापनेमुळे पँ१० ची पातळी वाढते. हे रोखण्यासाठी पक्काय रस्त्यांची बांधणी सैल मातीचे स्थिरकरण आणि हिरव्या आच्छादनाचा विस्तार अश्या उपाय योजनांचा समावेश केला जाऊ शकतो
- **उपाय वर्तन, प्रशासन आणि दीर्घकालीन नियोजनामध्ये निहित आहेत:** उगमस्थानावरील कचरा कापण्यापासून ते नियम आणि त्यांची अंमलबजावणी करणाऱ्या राजकीय आणि प्रशासनिक व्यवस्थेकडून उत्तरदायित्वाची गरज आहे लोकसहभाग आणि कठोर अंमलबजावणी हे कायमस्वरूपी हवा-गुणवत्ता सुधारण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत.

**श्री किशोर रिठे, संस्थापक, सातपुडा फाउंडेशन सदस्य, महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळ , दैनिक लोकसत्ता**

- **सद्धयाची प्रदूषण निरीक्षण व्यवस्था दिशाभूल करणारी आहे:** अमरावतीमध्ये फक्त दोन प्रदूषण मॉनिटर्स आहेत, जे उच्चभ्रू भागात आहे आणि ते पँ१० चे मोजमाप करतात. हे दाट लोकवस्ती आणि उच्च उत्सर्जन झोनमधील प्रदूषणाचे मोजमाप आणि माहिती संकलन करीत नाहीत, ज्यामुळे मूल्यांकन पक्षपाती आणि अपूर्ण होते.
- **वास्तविक जास्त प्रदूषण भागांमध्ये प्रदूषण मॉनिटर्सची तात्काळ आवश्यकता आहे**: मध्यवर्ती ठिकाणी जसे की राजकमल स्क्वेअर, जैस्तंभ चौक, आणि MIDC औद्योगिक पट्ट्यात वाहनांचा धूर, बायोमासचा वापर, कचरा जाळणे आणि उद्योगातून होणारे खरे उत्सर्जन प्रतिबिंबित करण्यासाठी स्टेशन्स स्थापित करणे आवश्यक आहे.
- **कचरा जाळणे हे प्रदूषणाचे प्रमुख कारण आहे:** नियमित कचरा उचलला जात असला तरीही, शहरातील बहुतेक कचरा उघड्यावर टाकला जातो आणि जाळला जातो—विशेषत: अंबा प्रवाहाभोवती ज्यामुळे धूर परत शहरामध्ये येतो. उच्च न्यायालयाच्या आदेशांची महापालिकेने अंमलबजावणी आणि कचरा पुनर्वापर यात गुंतवणूक करणे महत्त्वाचे आहे.
- **बायोमासचा वापर आणि त्याचा लिंगनिरपेक्ष प्रभाव लक्षणीय आहे:** झोपडपट्टी भागातील कुटुंबे सरपणवर अवलंबून राहतात, ज्यामुळे ज्या स्त्रिया ते गोळा करतात आणि आणि स्वयंपाक करतात-त्याच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतात.

- **नागरिक जागरुक आहेत, परंतु प्रशासनातील तफावत कायम आहे:** अमरावतीची जनता पर्यावरणाबाबत जागरूक आहे, परंतु प्रभावी वायु-गुणवत्ता सुधारण्यासाठी अधिक मजबूत महापालिका कृती, चांगली अंमलबजावणी आणि सर्वसमावेशक देखरेख प्रणाली आवश्यक आहे.

**श्री मोहन अटळकर , विशेष प्रतिनिधी, दैनिक लोकसत्ता**

- **अमरावती शहराची सामाजिक-आर्थिक संरचना शहराच्या प्रदूषण आव्हानांना आकार देते**: नऊ लाख मुख्यतः माध्यम आणि कमी उत्पन्न असलेल्या लोकसंख्येचा, वायू प्रदूषणाचा, दैनंदिन व्यवहार आणि मर्यादित संसाधनांशी जवळचा संबंध आहे.
- **पर्यावरणीय जागरूकतेची अभाव**: नागरिक आणि पत्रकार दोघांनाही प्रदूषणाच्या स्रोतांची पुरेशी माहिती नाही आणि दैनंदिन पद्धती खराब हवेच्या गुणवत्तेमध्ये कशा प्रकारे योगदान देतात अश्या विषयाबद्दल वर्षभर जागरूकता आणि क्षमता निर्माण करण्याची गरज आहे.
- **कमकुवत सार्वजनिक वाहतुकीमुळे वाहनांचे उत्सर्जन वाढते आहे**: शहरात फक्त १५ सार्वजनिक बसेस चालवल्या जातात, ज्यामुळे दुचाकींचे प्रमाण वाढत आहे आणि वाहतूक कोंडी होते— नगरपालिका नियोजन आणि सार्वजनिक वाहतूक तातडीने बळकट करण्याची गरज आहे.
- **बांधकामाशी संबंधित धूळ हा वाढता धोका आहे**: अमरावतीचा झपाट्याने विकास होत असताना, मोठ्या प्रमाणावर बांधकामामुळे मोठ्या प्रमाणावर धूळ निर्माण होत आहे, ज्यामुळे शहराच्या प्रदूषणात लक्षणीय भर पडत आहे.
- **प्रशासन आणि अंमलबजावणीतील तफावत कायम आहे:** धूळ-शमन मानदंड आणि इतर कायदेशीररित्या अनिवार्य पर्यावरणीय सुरक्षेसह गंभीर उपाय योजनांची अंमलबजावणी केली जात नाही.